VOL- X | ISSUE- III | MARCH | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# गडचिरोली जिल्हयातील गडकिल्ले पर्यटन'' : एक भौगोलिक अभ्यास

प्रा.डॉ. प्रशांत व्हि. बुराडे
भूगोल विभागप्रमुख
डॉ.अरुण मोटघरे महाविद्यालय,
कोंढा–कोसरा, ता.पवनी,जि.भंडारा
इमेलः prashantvburade@gmail.com

**सरांष :–**

*गडचिरोली हा विविध नैसर्गिक सौदंर्याने नटलेला जिल्हा आहे. या जिल्हयात मोठया प्रमाणात पर्यटन व्यवसाय विकसीत होवू शकतो. परंतू प्रत्यक्षात गडचिरोली जिल्हयातील पर्यटन स्थळाकडे इतक्ष करण्यात आलेला आहे. प्रस्तृत शोधनिबंधात गडचिरोली जिल्हयात कोणते गडकिल्ले आहेत? त्या गडकिल्लामध्ये कोणती विषेशतः आहे. या गडकिल्याच्या पर्यटनात कोणत्या समस्या आहेत? त्या वर काय उपाययोजना करायला पाहिजे? याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.*
*ज्ञमलूवतक – गडचिरोली जिल्हयातील गडकिल्ले पर्यटन*

**प्रस्तावना :–**

२० व २१ व्या षतकामध्ये जगामध्ये मोठया प्रमाणात औद्योगिकरणाचा विकास झालेला आहे. त्यामूळे मानव यंत्राप्रमाणे हा एखादया यंत्राप्रमाणे काम करू लागलेला आहे. त्याचे जीवन पूर्णता यंत्राप्रमाणे घडू लागले. त्यामुळे तो शारीरीक व माणसिक रित्या शकू लागला. त्याला कुठे तरी माणसिक व शारीरीक विठंगूळयाची गरज भासू लागली.

त्या करिता तो आवडत्या ठिकणी भेटी देवू लागला. व त्यातुनच पर्यटन व्यवसायाचा विकास झाला, व आज पर्यटन व्यवसायाने विशाल रूपधारण केलेले आहे. आज जगामध्ये प्रत्येक देशपर्यटन विकासाकडे मोठया प्रमाणात लक्ष देत आहे. व त्याकरिता मोठया प्रमाणात खर्च सुध्दा करित आहे.

भारतामध्ये प्राचिन काळापासून पर्यटनाला महत्व प्राप्त झाले आहे. भारतामध्ये प्राचिन काळापासुन धार्मिक पर्यटन मोठया प्रमाणात करण्यात येत आहे. पण आज २१ व्या शतकात धार्मिक पर्यटना सोबतच ऐतिहासिक, नैसर्गिक पर्यटनाचे महत्व सुध्दा वाढले आहे. आज मोठया प्रमाणात भारतामध्ये पर्यटनाचा विकास झालेला पहावयास मिळत आहे. व पर्यटनाच्या विकासामुळे उद्योगधंदे व व्यापार सुध्दा वाढत आहे.




**अभ्यासप्रदेश :–**

२६ ऑगस्ट १९८२ या दिवसी विस्ताराने मोठया असलेल्या चंद्रपूर जिल्हयाची विभागनी होवून गडचिरोली या जिल्हयाची निर्मीती झाली. चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयांची विभागनी करतांना वैनगंगा नदिचा आधार घेण्यात आला. वैनगंगा नदिच्या पूर्वेचा भुप्रदेश गडचिरोली तर पश्चिंमेचा भू–प्रदेश चंद्रपूर जिल्हा या आधारे विभागणी करण्यात आली. संपूर्ण जगात गडचिरोली जिल्हा मागसलेला म्हणून ओळखला जातो. गडचिरोली जिल्हयाच्या पश्चिम सिमेच्या मध्यभागात वर्धा नदी हि वैनगंगा नदिला येवून मिळते. वैनगंगा व वर्धा या

दोन नदयांच्या संगमानंतर निर्माण होणाऱ्या नदिच्या प्रवाहाला 'प्राणहिता नदी' या नावाने ओळखले जाते. गडचिरोली जिल्हयाचा पूर्व भाग हा डोंगराळ व घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. पूर्वेकडे टेकडयांच्या प्रदेश आहे. जिल्हयाचा पश्चिम व दक्षिण भाग नदयांच्या खोऱ्यापासून बनलेला आहे.

गडचिरोली जिल्हयाचे अक्षवृत्तीय स्थान १८°४१' उत्तर ते २०°५०' असे आहे. तर रेखावृत्तीय स्थान ७९°४६' पूर्व इतके आहे. १४४२२ चौरस कि.मी. इतके गडचिरोली जिल्हयाचे क्षेत्रफळ आहे.

उद्देश :—

गडचिरोली जिल्हयातील पर्यटनामध्ये गडकिल्यांना महत्वाचे स्थान आहे. या गडकिल्यांच्या काय समस्या आहेत? व त्यावर काय उपाययोजना करायला पाहिजे? याचा अभ्यास करणे.

गडचिरोली जिल्हयातील गडकिल्ले :—

गडचिरोली जिल्हयात तीन महत्वाचे किल्ले आहेत. ते पूढील प्रमाणे आहेत.

१) वैरागड :—

गडचिरोली जिल्हयातील आरमोरी तालूक्यातील वैरागड हा एक महत्वाचा किल्ला आहे. वैरागड किल्याचे अक्षवृत्तीय स्थान २०°१७' उत्तर व रेखावृत्तीय स्थान ७९°९६' पूर्व आहे. हा किल्ला, समूद्रसपाटी पासून २३१ मी. उंचीवर आहे. वैरागड या गावामध्ये हा किल्ला आहे. हा किल्ला गोंड स्थापत्य कलेचा उत्कृश्ठ नमूना आहे. हा किल्ला वैलोचना नदिच्या किनाऱ्यावर असून सभोवताल धनदाट जंगल आहे. हा किल्ला साधारणा १० एकर जागेमध्ये बांधलेला आहे. या किल्याच्या सर्व बाजूंनी बुरूजासह मजबूत तटबंधी आहे. या किल्याची तटबंधी ४.५ मी. ते ६.०० मी. उंचीची आहे. तटबंधि अतिशय सुरेख असून देवी—देवतांच्या कोरीव मूर्त्या त्यावर आहेत. या किल्यामध्ये प्रवेश करण्याकरिता एकून तिन दरवाजे आहेत. एक मुख्य दरवाजा असून दक्षिणेला, प्रथम प्रदेशद्वार तर पश्चिमेला चोर दरवाजा आहे. मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्याबरोबर मोठा चबुतरा आढळतो. या चबुतरावर कार्यालयीन कचेरी किवा किल्लेदाराचे घर असावे. दुसरा दरवाजा किल्याच्या दक्षिणेला असून तवर श्रीगणेशाची कोरीव मूर्ती कोरलेली आहे. तर किल्याच्या पश्चिमेला परकोटावर दोन बुरूजांच्या मध्ये छोटासा एक चोर दरवाजा आहे. किल्यामध्ये एकून चार प्राचीन विहिरी आहेत. यापैकी एक विहिर व निमूळती अजून तिला हत्तीचा हौद म्हणून ओळखले जाते. या विहिरीमध्ये उतरण्यासाठी दगडाच्या पायऱ्या आहेत, तसेच विहिरीमध्ये जलदेवतेची प्रतिमा आहे. किल्याच्या मध्यभागी भग्न झालेली राजवाडयासारखी इमारत आहे. किल्याच्या, सभोवताल प्राचीन काळातील खंदक खोदलेला आहे. किल्याच्या उजव्या बाजूला तटबंधीला लागुनच भगवान विष्णूचे मंदिर आहे.

२) टिपागड किल्ला :—

गडचिरोली जिल्हयातील नैसर्गिक सौदंर्याने नटलेला हा घनदाट जंगल व पाहाडांमधील किल्ला आहे. हा किल्ला गडचिरोली जिल्हयातील कोरची तालूक्यात मुरुमगाव पासून ८.० किमी अंतरावर आहे. हा किल्ला गडचिरोली मुख्यालयापासून ८०—९० किमी अंतरावर आहे या किल्यांचा अक्षवृत्तीय विस्तार २०°२९'०४'' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ८०°३२'०'' पूर्व असा आहे. समुद्र सपाटीपासून साधारणत: २००० मीटर उंचीवर हा किल्ला आहे. पूर्णता टेकडयांनी वेढलेला हा किल्ला आहे. हा किल्ला गोंड व माना राजवटीचा साक्ष देणारा किल्ला आहे.

हा किल्ला टेकडयांवर बांधण्यात आलेला असून उंचावर मानव निर्मीत विशाल जलाशय येथे पाहावयास मिळले. या जलाशयामूनच एका छोटयाशा नदीचा उगम झालेला आहे. या नदीला टिपागडी नदी असे म्हणतात. या जलाशय जवळच एका खिंडीच अवषेश पाहावयास मिळतात. या खिंडीतून आतमध्ये प्रवेश करताच दक्षिणेस एक किल्ला बांधलेला आहे. या पहिल्या किल्याच्या आतमध्ये पून्हा एक किल्ला बांधलेला आढळतो. या किल्याची तटबंधी नैसर्गिक असल्याचे आढळते. टेकडयांनी या किल्याची तटबंदी केलेली आढळते. या किल्याचा वरून आजू बाजूच्या परिसरातील अतिशय सुंदर नैसर्गिक' सौदर्य पाहता येते. हा किल्ला नेमका केव्हा बांधाला या विषयी वाद आहे.

३) सुरजागड किल्ला :—

गडचिरोली जिल्हयात एटापल्ली तालूक्यातील हा किल्ला आहे. हा किल्ला एटापल्ली मुख्यालयापासून १५—१७ किमी अंतरावर आहे. सुरपागड किल्ला हा

सुरजागड पहावर बांधलेला आहे. असत आज पूर्णत: भग्नावस्थेत हा किल्ला आहे. उंच डोंगरावरील तटबंधि व पठार हे या किल्याचे वैशिष्ट आहे. माना नागवंशिय राजा सुर्जत बडवाईक यांनी हा किल्ला बांधला व त्याला आपल्या नावावरून 'सुरजागड' हे नाव दिले. या किल्याच्या सभोवतालच्या टेकडयांवर लोहखनिजांचे विपूल साठे आहेत. आज हा किल्ला पूर्णत: भग्नावस्थेत आहे. या किल्ल्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२७'१२'' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७३°१३'३४'' पूर्व असा आहे. हा किल्ला समुद्र सपारी पासून ८२५ मी. उंचीवर आहे.

वैशिष्टे : –

गडचिरोली जिल्हयात तिन किल्ले असून त्यांची वैशिस्टे पढील प्रमाणे आहेत.

(१)गडचिरोली जिल्हयातील सर्व किल्ले हे नैसर्गिक सौंदर्याने व्यापलेले आहेत.

(२)या किल्यांना प्राचीन असा गौरवशाली इतिहास लाभलेला आहे.

(३)हे किल्ले घनदाट अशा जंगलात आहेत.

(४)या किल्यांच्या पर्यटनासोबतच वनपर्यटन सुध्दा वाढू शकते.

(५)या किल्यांपर्यंत सहजरित्या जाता येते. येथे वाहतूकीची सुविधता आढळते.

(६)गडकिल्यांवर गोड व माना स्थापत्य कलेचा प्रभाव पाहावयास मिळते.

(७)गडकिल्यांवरील धार्मिक घटकांचा पर्यटन वाढीसाठी वापर होते.

समस्या :–

गडचिरोली जिल्हयातील किल्यांच्या पर्यटनामध्ये समस्या पूढील प्रमाणे आहेत.

१. प्रसिद्धीचा अभाव :– गडचिरोली जिल्हयातील हे किल्ले प्रसिद्धी पासून कोसो दूर आहेत. शासनाच्या उदासिनतेमूळे या किल्लाविषयी व त्यांच्या इतिहासाविषयी सामान्य नागरीकांना या माहिती नाही. त्यामूळे पर्यटक येथे येत नाहीत.

२. भारतीय पूरातत्व विभागाचे दुर्लक्ष :– गडचिरोली जिल्हयातील किल्यांची सध्याची परिस्थीती अतिशय दयनिय आहे. मोठया प्रमाणात या किल्यांची पडझळ झालेली आहे. त्यांची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. पण भारतीय पूरातत्व विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

३. सुविधांचा अभाव :– किल्यामध्ये सुविधा निर्माण करणे गरजेचे असते. पण प्रत्यक्षात या किल्यांमध्ये कोणत्याच सोई सुविधा निर्माण केलेल्या नाहीत.

४. नक्षलवाद :– गडचिरोली जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात नक्षलवाद वाढलेला आहे. त्यामूळे षासनाच्या असंख्य योजना गडचिरोली जिल्हयात कार्यान्वीत झालेल्या नाहीत. तसेच वैरागड, टिपागड, सुरजागड हे तिन्ही किल्ले जंगल श्रेत्रात आहेत. आणि या तिन्ही किल्ल्यांच्या परिसरात नक्षलवादांचा मोठा प्रभाव आहे.

५. अंधश्रध्दा :– या किल्यांमध्ये व किल्यांच्या परिसरात गुप्तधन गडलेला आहे. अशी अंधश्रद्धा या परिसरातील नागरीकांमध्ये आहे. त्यामुळे नागरीक गुप्तधन शोधण्यासाठी किल्यामध्ये व किल्याच्या परिसरामध्ये खोदकाम करतात. व त्यामुळे किल्यांचे नुकसान होते.

उपाययोजना :–

गडचिरोली जिल्हयातील गडकिल्ले पर्यटनाचा विकास करण्यासाठी पूढील उपाय योजना करायला पाहिजेत.

(१)गडचिरोली जिल्हयातील गडकिल्यांची प्रसिदधी विविध माध्यमानद्वारे करायला पाहिजे.

(२)गडकिल्यांची दूरूस्ती करणे आवश्यक आहे.

(३)गडकिल्यानवर विविध सोई–सुविधा निर्माण करणे. आवश्यक आहे.

(४)गडकिल्यावर विविध पर्यटन महोत्सव आयोजित करण्यात यावे.

(५)नक्षलवादाचा प्रभाव नाहिसा करण्यात यावा.

(६)गडकिल्यांची तोंड–फोंड करण्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी.

निष्कर्ष :–

गडचिरोली हा आदिवासी, मागासलेला व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणुन परिचीत आहे. पण या जिल्हयामध्ये अतिशय सुंदर व आकर्षक अनेक पर्यटन स्थळे आहेत. हे पर्यटन स्थळे नैसर्गिक सौदर्याने परिपूर्ण असुन ऐतिहासिक व धार्मिक दृष्टया महत्वाचे आहेत.

त्यामध्येच वैरागड, टिपागड व सरजागड हे तिन्ही किल्ले गोंड व माना संस्कृतीचा जिवंत उदाहरण आहेत. हे किल्ले नैसर्गिक सौदर्याने परिपूर्ण असुन माना व गोंड शासकांच्या पराक्रमाचा साक्ष देणारे आहेत. पण आज या गडकिल्ल्यांची मोठया प्रमाणत पडझड झालेली आहे. त्यामुळे गोंड व माना शासकांचा गौरवशाली वारसा नष्ट होत आहे. या गडकिल्लयांचा विकास केल्यास या जिल्हयाच्या पर्यटनाला मोठया प्रमाणात चालणा मिळेल. व त्यामुळे गडचिरोली जिल्हयाचा सुध्दा विकास होईल.

संदर्भग्रंथ :—


1. अ.ज. राजुरकर, चंद्रपूरचा इतिहास, महाकाली प्रकाशन (१९५६).
2. डॉ. नालिनी टेंभेकर, पूर्व विदर्भातील प्रेक्षणिय व ऐतिहासीक स्थळे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्यूटर नागपूर.
3. चंद्रशेखर गुप्त, विदर्भ ऐतिहासीक एंव भौगोलिक पृष्टभूमी (१९९६).
4. चंद्रशेखर गुप्त, विदर्भातील किल्ले (२००५).
5. डॉ. विठ्ठल घारपुरे, पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (२०१०).
6. गडचिरोली जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन (२०११).
7. गडचिरोली जिल्हा जनगणना पुस्तीका (२०११).
8. चांदा डिस्ट्रीक्ट गॅझेटियर (२००५).